**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-३**
**सन २००७-२००८.**

विषय क्रमांक :- १ शुक्रवार दिनांक ४/५/२००७

ठराव क्रमांक :- १ शुक्रवार दिनांक ४/५/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/४/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकुर :-**मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/४/२००७ रोजी झालेल्या मा.स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त कायम करणे साठी मा.स्थायी समिती पुढे ठेविले.

हा विषय सभेमध्ये वाचून दाखविला असता त्यावर सभेमध्ये झालेली चर्चा.

मा.श्री. तिवारी सु.र. :- मागिल सभे मधील प्रस्तावांची माहिती देण्यांत यावी.

त्या प्रमाणे मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/४/२००७ रोजीचे सभे मध्ये पारित केलेले प्रस्ताव वाचून दाखविण्यांत आले.

मा.श्री. जोशी अ.सु. :- ठिक आहे. कार्यवृत्त मंजूर करावे.

मा.श्री. तिवारी सु.र. :- बुरूडगांव रोड भागातील ड्रेनेजचे पाईप लाईनचे कामाचे काय झाले.?

शहर अभियंता श्री. मगर एन्.बी. :- ड्रेनेज लाईनचे सर्व कामांचे एस्टीमेट नुसार पाईप खरेदी प्रस्ताव मंजूरीस ठेवलेले असून सदरचे कामांची प्रोसिजर चालू आहे.

मा.सभापती साहेब :- सर्व कामे पावसाळया पूर्वी पूर्ण करावीत.

मा.श्री.त्रिपाठी सु.च. :- मागिल सभेत मंजूर केलेला अग्निशमन विभागाचे स्टॅपिंग पॅटर्नचा विषय या सभेत निर्णया साठी घेता आला असता.

मा.श्री. जोशी अ.सु. :- आपले दोन फायर फायटर स्टेशन प्रस्तावीत केलेले असून त्या नुसार तयार केलेल्या स्टॅपिंग पॅटर्नला मंजूरी दिलेली आहे.

सहाय्यक आयुक्त मा.श्री. देशमुख :- फायर फायटर बाबत मा.शासनाचे कमेटीने केलेल्या सुचना नुसार तयार केलेल्या स्टॅपिंग पॅटर्नला मंजूरी दिलेली आहे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- मा.शासनाकडेस प्रस्ताव गेल्यास शासन अतिरिक्त कर्मचा-यांची भरती करेल.

सहाय्यक आयुक्त मा.श्री. देशमुख :- पद मंजूरी नंतर भरतीचा प्रश्न म.न.पा.चा असेल आपण शिफारस केलेल्या पदास मा.शासन मंजूरी देईल त्या नंतर सदर पदे भरली जातील शासनाने मंजूरी दिल्या नंतर आपणास अनुदान मिळेल.

मा.श्री. जोशी अ.सु. :- मागील जनरल बोर्डा मध्ये स्थायी समिती चुकीचे निर्णय घेते अशा बाबत आरोप केले गेले हे चुकीचे आहे. अधिका-यांनी केलेल्या गैरसमजा मुळे हे आरोप झालेत त्यास कुनी ही विरोध केला नाही.

मा.सभापती साहेब :- पाईप खरेदी करू नये असा ठराव आपण केलेला नाही. पाईप खरेदी स्थायी समितीचे मंजूरीने करावी असे ठरविलेले होते.

मा.श्री.तिवारी सु.र. :- अधिका-यांनी चुकीची माहिती दिलेली आहे.मागिल सभेचे कार्यवृत्त कायम करणेत यावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदीला कुनीही विरोध केलेला नव्हता शॉट मुदतीचे टेंडर मागवून जादा दर आल्यास जीवन प्राधिकरणाचे दर कराराने पाईप खरेदी स्थायी समितीची मंजूरी घेउन करावी असे ठरले होते.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- सदर प्रकरणी कायदेशीर मत मागवावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- पाईप खरेदीस हरकत नाही असा ठराव केला आहे शहर अभियंता यांनी पुढील ज.बो. मध्ये तसा खुलासा करावा.

मा.श्री. घुले अ.ह. :- स्थायी समितीचा पाईप खरेदीस विरोध नव्हता हे सांगावे.

मा.श्री. जोशी अ.सु. :- दिनांक २३/४/२००७ रोजीचे सभेचे कार्यवृत्त कायम करावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- कार्यवृत्त कायम करावे.

मा.सभापती साहेब :- मागील सभा दिनांक २३/४/२००७ रोजी चे सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर.

**ठराव :-** मा.स्थायी समिती सभा दिनांक २३/४/२००७ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

अनुमोदक :- मा.श्री. तिवारी सु.र.

ठराव सर्वानुमते मंजूर

sdxxx/-
सभापती,
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक .३**
**सन. २००७-२००८**

विषय क्रमांक २ शुक्रवार दिनांक ४/५/२००७

ठराव क्रमांक २ ुक्रवार दिनांक ४/५/२००७

**प्रस्तावाचा विषय :-**मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१,५२,५३ व ५४ चे तरतुदीनुसार केलेल्या अहमदनगर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची पदसंख्या, पदनाम, वेतनश्रेणी , सेवाशर्ती सह आकृती बंधा बाबत मा.शासन निर्णया प्रमाणे दूरूस्त कार्यालयीन प्रस्ताव आदेशार्थ.

**प्रस्तावाचा मजकुर :-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाच्या दि.३०/६/०३ च्या अधिसुचने नुसार तत्कालीन नगरपरिषदेचे महानगरपालिकेत रूपांतर करण्यांत आलेले आहे व मुंबई प्रांतिक महानगरपालिका कायद्याच्या तरतुदी लागु झालेल्या आहेत.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५१ अन्वये अन्य अधिकारी व कर्मचा-यांची संख्या पदनामे वेतनश्रेणी कलम ५२ स्थायी अधिकारी व कर्मचारी यांच्या नेमणूकी वरील निर्बंध कलम ५३- नेमणूकीचा अधिकार विहित असणे कलम -५३ नेमणूक करण्याची रित याबाबत तरतुदी आहेत.

कलम ५१ पोट कलम (१) लेखा परिक्षक, सहाय्यक लेखा परिक्षक अधिकारी, लिपीक व कर्मचारी यांची संख्या, पदनाम ,श्रेणी, वेतन फी व भत्ते ठरविल्या बाबत पोट कलम (४) च्या अधिन स्थायी समितीने ठरविणे आवश्यक आहे. पोट कलम (२) अन्वये आयुक्तांनी या बाबतचे विवरण पत्र तयार करून स्थायी समिती पुढे मांडले पाहिजे, पोट कलम (३) अन्वये सदर, विवरण पत्र स्थायी समिती तसेंच्या तसे किंवा त्यात इष्ट असे फेरबदल करता येतील. पोट कलम (४) अन्वये ज्या पदाचे वेतन भत्ते वगळून रू.८००/- किंवा जास्त आहे असे पद निर्मिती चा अधिकार मा.शासनास आहे. पोट कलम (५) अन्वये कलम ५३ अन्वये तात्पुरती नेमणूक करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांना आहे.

कलम ५२ कलम ५१ चे पोट कलम (१) अन्वये पदे श्रेणी ठरविल्या नसतील तर नेमणूका करता येणार नाही.

कलम ५३(१) महानगरपालिका अधिका-यांचे किमान मासिक वेतन रू.४००/- पेक्षा जास्त असल्यास नेमणूकीचा अधिकार महानगरपालिके कडे असेल मात्र विशेष बाबी साठी सहा महिन्यासाठी तात्पुरती नेमणूकीचा अधिकार मा.आयुक्त यांना आहे.

कलम ५४ अन्वये निवड समिती नेमून त्या द्वारे कर्मचारी निवड करणे बाबत तरतुद आहे.

वरील प्रमाणे कायदेशीर तरतुदी पहाता सोबतच्या तक्त्यात कर्मचारी आकृती बंधा प्रमाणे सध्या असलेली पदे त्यांची वेतन श्रेणी पदसंख्या यांची सुधारीत आराखडया प्रमाणे कोणत्या पदावर समायोजन करण्यांत आलेले आहे. त्यांचे विवरण पत्र आकृती बंधा प्रमाणे वाढीव आवश्यक पदे या बाबत सविस्तर विवरण पत्र तयार करण्यांत आलेले असून त्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५१,५२,५३ व ५४ प्रमाणे मा.स्थायी समितीच्या शिफारसीची आवश्यकता आहे. (परिशिष्ट "अ")

सदर कलमान्वये परिशिष्ट "ब"मध्ये नमुद केल्या प्रमाणे प्रर्तेक पदाचे पदनाम जबाबदारी, शैक्षणिक पात्रता, भरतीची पध्दत या बाबत विवरण पत्र सोबत जोडलेआहे. त्या साठी मा.स्थायी समितीची शिफारस आवश्यक आहे. मा.स्थायी समितीचे शिफारसी नंतर मा.महासभेने निर्णय घेणे आवश्यक आहे.

मा.महासभेच्या निर्णयानंतर कलम ५१ तसेच कलम ४५४(अ) व ४५७ (३)(अ) व (ब) अन्वये महाराष्ट्र शासन मा.नगर विकास विभाग यांची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी आदेशार्थ,

येणे प्रमाणे आस्थापणा अधिक्षक यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (सा) :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५१ अन्वये मा.स्थायी समिती कडे मंजूरी साठी सादर करणे साठी शिफारस आहे. दि.०३/०१/०६.

मा.आयुक्त साहेब :- प्रस्तावाशी सहमत दि.०३/०१/०६

फेर सादर,

मा.स्थायी समिती ठराव नं.५ दि.२९/५/२००६ अन्वये सेवाशर्ती सह आकृती बंधा बाबत साधक बाधक चर्चा होउन सुधारित आदेशामध्ये सुचविल्या नुसार आवश्यक ते फेरबदल करून प्रस्ताव सादर करावा असा ठराव झालेला आहे.

१) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई निर्णय क्र. संकिर्ण१००५/वर्गीकरण/ प्र.क्र.३७१/०५ /नवि.२४ दि.४ मे२००६ अन्वये महाराष्ट्रातील २२ महानगरपालिकांची अ ब क व ड अशी वर्गवारी करण्यांत आलेली असून त्याचा तपशील असा.-

"अ" वर्ग - बृहन्मुंबई महानगरपालिका.

"ब" वर्ग - पुणे, नागपुर महानगरपालिका.

"क" वर्ग - पिपंरी चिंचवड, ठाणे, नाशिक ,नवि मुंबई महानगरपालिका.

"ड" वर्ग - सोलापूर ,औरंगाबाद,कल्याण -डोंबबिली, कोल्हापुर, सांगली- मिरज आणि कुपवाड,अमरावती, मीरा भाईदंर, उल्हासनगर, भिवंडी-निजामपुर, अहमदनगर, अकोला,जळगांव,नांदेड- वाघळा शहर, धुळे ,मालेगांव, महानगरपालिका.

या पुढे दर दहा वर्षानी जनगणनेची आकडेवारी उपलब्द झाल्या नंतर लोकसंख्या, महानगरपालिकेचे स्वतःचे दरडोही उत्पन्न महानगरपालिकेचे दरडोई क्षेत्रफळ याबार्बी विचारात घेउन शासन महानगरपालिकांचे फेर वर्गीकरण करेल.

महानगरपालिकेच्या वर्गीकरणाद्वारे मुंबई महानगरपालिका वगळून अन्य २०महानगरपालिका मधील सेवांची परिशिष्ट-१ प्रमाणे १ प्रशासकीय सेवा २ लेखा सेवा ३ तांत्रिक सेवा या तीन सेवांमध्ये विभागणी करण्यांस आणि परिशिष्ट-२ प्रमाणे महानगरपालिकेच्या सेवांतील ३८ संवर्गातील अधिका-यांच्या पदांचे पदनाम पदसंख्या व वेतनश्रेणी यांचा आकृतीबंध (Staffing Pattern) निश्चिती साठी [मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ४५,४६,४७,५१,५३,५४ व ३४६ ते ३४८ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम ४९,५०,५१ अन्वये प्राप्त अधिकारांतर्गत] या आदेशान्वये शासनाची मान्यता देण्यांत येत आहे.

महानगरपालिकाच्या तिन्ही सेवांतर्गत विभाग व उपविभागातील कामकाजांचे स्वरूप पहाता आवश्यक असणा-या अधिका-याची संख्या व पदनामे यांचा आढावा, घेण्यात आला असून सदर आढाव्यानुसार "ब" "क" "ड" वर्गातील महानगरपालिकांच्या वर्गीकरण निहाय आवश्यक ३८ संवर्गातील पदांची पदनामे पदसंख्या व वेतनश्रेणी निश्चित केली आहे.

**१]** महानगरपालिकांना विकास कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. त्या साठी त्यांच्या आस्थापणा खर्चावर नियंत्रण देखिल राहणे. गरजेचे आहे. महानगरपालिकांचे वर्गीकरण व ३८ अधिकारी संवर्गातील पदांचा आकृतीबंध निश्चित करतांना महानगरपालिकेच्या आस्थापणा खर्चावर नियंत्रण रहाण्या साठी जास्तीत जास्त ३५% एवढी खर्च मर्यादा ठेवण्यांत येत आहे. आस्थापणा खर्चा मध्ये वेतन, निवृत्ती वेतन, कार्यालयीन खर्च वाहन, इंधन, स्टेशनरी, बैठका वरील खर्च, दुरूस्ती महानगरपालिकेतील आउट सोसींग मार्फत होणारी कामे या साठी महानगरपालिकेस येणारा खर्च याचा देखिल समोवश राहिल.आस्थापणा खर्च ३० % पेक्षा अधिक झाल्यास महानगरपालिकेने अत्यावश्यक असेल अशी परिस्थीती वगळता नवीन पद निर्मितीचे प्रस्ताव शासना कडे मंजूरी साठी पाठवू नयेत.

**२]** "ब" वर्ग महानगरपालिके मध्ये 'अतिरिक्त आयुक्त ' या पदावर आखिल भारतीय सेवेतील अधिका-यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यांत येईल. "क" वर्ग महानगरपालिकेतील "अतिरिक्त आयुक्त " पदावर ज्या रितीने शासन सेवेतील समकक्ष व योग्य अधिका-यातुन प्रतिनियुक्तीने ज्या पात्रतेचे अधिकारी नियुक्त केले जातील.त्याच दर्जाचे व त्याच रितीने "ब" वर्ग महानगरपालिकेतील "उपायुक्त " पदावर नियुक्त्या देण्यांत येतील.

**३]** "क" वर्ग महानगरपालिके मध्ये "अतिरिक्त आयुक्त "हे पद रू.१०६५०-१५८५० या वेतनश्रेणीतील शासनाच्या सेवेतील समकक्ष व योग्य अधिका-यातुन या पूर्वी मंत्री मंडळाने घेतलेल्या दि.१० मे २००४ च्या निर्णयाप्रमाणे भरण्यांत येईल.अथवा महानगरपालिकेच्या फक्त प्रशासकीय सेवेतील अधिका-यातुन पदोन्नतीने शासन मान्यते नंतर भरण्यांत येईल. महानगरपालिकेच्या तांत्रिक सेवा किंवा लेखा सेवेतुन "अतिरिक्त आयुक्त " पदावर पदोन्नती देण्यांत येणार नाही.

**४]** प्रशासकीय सेवेतील अधिका-यांची (Non Technical) तांत्रिक व लेखा सेवेतील पदावर किंवा तांत्रिक व लेखा सेवेतील अधिका-यांची प्रशासकीय सेवेतील पदांवर बदलीने / प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येणार नाही.

**५]** आकृतीबंध निश्चिती मध्ये एखाद्या पदाची वेतनश्रेणी कोणत्याही महानगरपालिकेत कार्यरत अधिका-यांच्या सध्याच्या वेतनश्रेणी पेक्षा कमी दर्शविलेली असेल. अशा प्रकरणी तो अधिकारी संबंधीत पदावर सेवेत असे पर्यत त्यास प्रतिकुल बदल होणार नाही.

**६]** आकृतीबंधा मध्ये वर्गीकरण निहाय मंजूर केलेल्या पदसंख्ये पेक्षा अधिक पदे एखादया महानगरपालिकेस सध्या मंजुर असतील आणि त्या पदावर अधिकारी कार्यरत असतील तर असे अधिकारी सेवेत असे पर्यत किंवा ते पदोन्नत होई पर्यत सदर जादा पदे अस्तित्वात राहतील. तद्नंतर अशी जादा पदे आपोआप रद्द होतील. स्थानिक परिस्थिती व गरज विचारात घेता या शासन निर्णयानुसार मंजूर पदांपेक्षा जास्त पदे किंवा अतिरिक्त पदे निर्माण करणे आवश्यक असे महानगरपालिकेस वाटल्यास आणि महानगरपालिकेच्या आस्थापणा खर्च विहित टक्केवारी च्या मर्यादे पेक्षा कमी असल्यास महानगरपालिकेच्या प्रस्तावा नुसार शासन जास्तीच्या आवश्यक पदांना स्वतंत्र आदेशाने मंजूरी देईल.

तसेच ज्या महानगरपालिका मध्ये संविधानिक आणि इतर अत्यावश्यक पदांची मंजुर पदसंख्या आकृती बंधान्वये दर्शविलेल्या पदांपेक्षा कमी असेल अशा महानगरपालिकांनी योग्य त्या समर्थनासह प्रस्ताव शासनाकडे मंजूरी साठी पाठवावेत.

**७]** मुख्याधिकारी संवर्गाच्या सेवेतील पदोन्नतीची कुंढीतता घालविण्यासाठी शासन निर्णय क्रमांक एम्.सी.ओ.१२९५ /३३०८/प्र.क्र.१३८/९५/नवि १४ दि.१० मे २००४ नुसार "ब" "क" "ड" वर्गातील सर्व महानगरपालिकेत मंजूर असलेल्या " सहाय्यक आयुक्त" "उपायुक्त " व समकक्ष पदांच्या ५०% पदावर मुख्याधिकारी संगवर्गातील समकक्ष व योग्य अधिका-यांची नियुक्ती करण्यांत येईल."ड" वर्गात समाविष्ट नवनिर्मित मिरा भाईदंर ,भिवंडी,जळगांव, मालेगांव, अहमदनगर ,धुळे व अकोला आणि यापुढे निर्माण होणा-या महानगरपालिकेत वर्ग १ मधील जेष्ठ व योग्य मुख्याधिका-यांना " आयुक्त " व सध्या अस्तित्वात असलेल्या आणि परिशिष्ट-२ मधील मंजूर पदे विचारात घेउन " अतिरिक्त आयुक्त " पदावर नियुक्त्या देण्यांत येतील.

**८]** नगरपालिकामध्ये मुखाधिकारी यांचा प्रशासकीय कामकाजाचा अनुभव लक्षात घेता फक्त लोकसंख्येच्या निकषावर म्हणजेच ३ लाखापेक्षा अधिक लोक संख्या झाल्यामुळे 'अ' वर्ग नगरपालिकांचे महानगरपालिकेत रूपांतर होते. त्यामुळे त्या ठिकाणी "मुख्याधिकारी " या ऐवजी "आयुक्त " पदनामचा अधिकारी प्रशासकीय प्रमुख म्हणून नियुक्त होतो. त्या वेळी मुख्याधिकारी संवर्गातील अधिका-यांना महानगरपालिकेतील अतिरिक्त आयुक्त, उपायुक्त, सहाय्यक आयुक्त या सेवा मध्ये त्यांच्या नगर पालिका या स्थानिक स्वराज्य संस्थेतील कामाचा अनुभव विचारात घेता नियुक्तीची संधी या विभागाच्या दिनांक १० मे २००४ च्या शासन निर्णयान्वये मिळणार आहे. त्यामुळे राज्यातील मुख्याधिकारी संवर्गातील अधिका-यांच्या महानगरपालिकेतील विविध पदावरील नियुक्ती बाबत या विभागाचा शासननिर्णय दि.१० मे २००४ अनुंषगाने आवश्यक ते सर्व बदल महानगरपालिकेतील अधिकारी /कर्मचारी पदांच्या एकत्रित संवर्ग (Common Cadre) व एकत्रित सेवा प्रवेश नियम(Common Recruitment Rule) निश्चिती प्रसंगी करण्यांत येईल.

**९]** महानगरपालिकेच्या अधिका-यांच्या ३८ संवर्गातील पदांच्या व्यातिरिक्त उर्वरित संवर्गातील अधिकारी व इतर कर्मचारी यांच्या पदांचा आकृती बंध लवकरच होणा-या महानगरपालिकेच्या स्वतंत्र एकत्रित संवर्ग(Common Cadew)निश्चिती वेळी ठरविण्यांत येईल

**१०]** ज्या महानगरपालिकांची स्वत:ची वैद्यकीय महाविद्यालये व इतर परिवहन सेवा अस्तित्वात नाहीत. त्यांना बगळून उर्वरीत महानगरपालिका साठी वैद्यकीय अधिक्षक अधिष्ठाता परिवहन व्यावस्थापक, उप व्यावस्थापक व इतर संबंधीत व इतर संबंधीत पदे मंजूर केली आहेत. तसेच ज्या महानगरपालिका खाजगी करणा मार्फत अभिकर्त्याद्वारे परिवहन सेवा चालवतात. त्यांना या सेवे साठी आकृती बंधा मध्ये दर्शविलेली संबंधीत पदे मंजूर करण्यांत येणार नाहीत. त्यांनी त्याच्या आस्थापने वरील मंजूर पदा मधून सदर गरज भागवावी.

सदर शासन निर्णयाप्रमाणे अहमदनगर महानगरपालिकेत खालील प्रमाणे पदे, पदांची संख्या व त्यांची वेतनश्रेणी वर्ग "ड" प्रमाणे पात्र झालेली आहेत. मुळ प्रस्तावा मधील त्या त्या पदा बाबतची वेतनश्रेणी व पदसंख्या सुधारित करावी लागतील.

| अ.नं | पदाचे नांव | पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | उपायुक्त | २ | ८०००-१३५०० |
| २ | सहाय्यक आयुक्त | ४ | ६५००-१०५०० |
| ३ | मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| ४ | सहाय्यक मुल्य निर्धारक कर संकलन अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ५ | महिला व बाल विकास अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ६ | समाज विकास अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ७ | कायदा विधी अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ८ | सुरक्षा अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| ९ | सांख्यिकी अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| १० | अधिक्षक | १ | ५५००-९००० |
| ११ | महानगरपालिका सचिव / नगरसचिव | १ | ७४५०-११५०० |
| १२ | मुख्य लेखा अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| १३ | मुख्य लेखा परिक्षक | १ | ८०००-१३५०० |
| १४ | लेखा अधिकारी | १ | ६५००-१०५०० |
| १५ | उपमुख्य लेखा परिक्षक | १ | ६५००-१०५०० |
| १६ | वैद्यकीय (आरोग्य) अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| १७ | सहाय्यक सार्वजनिक आरोग्य अधिकारी | १ | ५५००-९००० |
| १८ | शहर अभियंता /जलअभियंता | १ | १०६५०-१५५०० |
| १९ | कार्यकारी अभियंता | २ | १०६५०-१५५०० |
| २० | उपअभियंता | ४ | ८०००-१३५०० |
| २१ | उपअभियंता (पा.पु.) | १ | ८०००-१३५०० |
| २२ | उपसंचालक नगररचना | १ | १०६५०-१५५०० |
| २३ | सहाय्यक संचालक -नगररचना | १ | ८०००-१३५०० |
| २४ | सिस्टीम मॅनेजर (ई -प्रशासन) | १ | ६५००-१०५०० |
| २५ | पर्यावरण संवर्धन अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| २६ | मुख्य अग्निशमन अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| २७ | सहाय्यक अग्निशमन अधिकारी | १ | ६५००-१०५०० |

सदर शासन निर्णया प्रमाणे पदांची संख्या व वेतनश्रेणी मुळ प्रस्तावात घेउन सेवाशर्ती तक्त्या मध्ये त्याप्रमाणे दूरूस्त्या करण्यांत आलेल्या आहेत.

शासन निर्णय क्र.अ.म.पा १००५/प्र.क्र ६३/नवि २४ दि.७/१२/२००६ नुसार अहमदनगर महानगरपालिकेचे आस्थापणेवर खालील नविन पदे निर्माण करण्यांत आलेली आहेत.

| अ.नं | पदाचे नांव | पद संख्या | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | कनिष्ठ अभियंता | ९ | ६५००-१०५०० |
| २ | सहाय्यक नगररचनाकार | ३ | ६५००-१०५०० |
| ३ | मुख्य लेखा अधिकारी | १ | ८०००-१३५०० |
| ४ | सिस्टीम मॅनेजर | १ | ६५००-१०५०० |
| ५ | संगणक प्रोग्रामर | १ | ५५००-९००० |

सदर शासन निर्णयाप्रमाणे पदांची संख्या व वेतनश्रेणी मुळ प्रस्तावात घेउन सेवाशर्ती तक्त्या मध्ये त्या प्रमाणे दूरूस्त्या करणेत आलेल्या आहेत.

**वरील प्रस्तावास मा.स्थायी समिती व महासभेची मान्यता मिळाले नंतरचा आकृतीबंध मा.शासनाच्या नगर विकास विभागाकडे मान्यते साठी पाठवावा लागेल. तरी आदेशार्थ सादर सोबत सेवाशर्ती जोडल्या आहेत.**

येणे प्रमाणे सहाय्यक आयुक्त श्री. देशमुख आर.ए.यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- **'अ '** प्रमाणे कार्यवाही करणेसाठी शिफारस आहे.

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही.

सबब प्रकरण मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

शुक्रवार दिनांक ४/५/२००७ रोजीचे अजेंडयावरील विषयासह अहमदनगर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचे आकृती बंधा बाबतचे प्रस्तावावर निर्णय घेण्यासाठी बोलावण्यांत आलेल्या व पुढे दिनांक ७/५/२००७ रोजी चालू असलेल्या सभेमध्ये मा.स्थायी समिती सदस्य यांनी खालील प्रमाणे सुचना केल्या व त्यांची मते मांडली.

मा.श्री. जोशी अ.सु. :- आपले महानगरपालिकेमध्ये केडर नंबर १ ते ५ मधील कर्मचा-यांची संख्या ८२ आहे. त्या मधील पदवी धरांची संख्या ३५ % व मॅट्रीक असलेल्या कर्मचा-यांची संख्या ६५% आहे. स्टॅपिंग पॅटर्न मध्ये पदोन्नती साठी पदवीधर ही शैक्षणिक पात्रता निश्चित केलेली आहे. ती शिथील करून एस.एस.सी. , एल.एस.जी.डी. व वीस वर्षाचा कामाचा अनुभव अशी व वयांची ४५ वर्षे पुर्ण केलेल्या कर्मचा-यास एल.जी.एस.ही शैक्षणिक पात्रता अथवा विभागीय परिक्षा देण्यांचे बंधन शिथील करण्यांत यावे.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- जे.सी.बी. ड्रायव्हर या संवर्गातील पदाचे सरळ सेवांतर्गत भरती साठीचे प्रमाण १००% ठेवलेले आहे त्यामुळे आपले म.न.पातील जे.सी.बी. ड्रायव्हर कोर्स पुर्ण केलेले व चांगले ड्रायव्हींग असलेल्या कर्मचा-याना पदोन्नती साठी संधी मिळणार नसल्याने सदरचे जे.सी.बी. ड्रायव्हर या संवर्गातील भरती साठी सरळ सेवातर्गत भरती ५० % व पदोन्नती साठी ५० % याप्रमाणे भरती पध्दतीत दूरूस्ती करण्यांत यावी.

मा.श्री. घुले अ.ह. :- सॅनिटरी सब इन्स्पेक्टर या संवर्गातील पदा साठी सरळ सेवांतर्गत भरती ७५ % व पदोन्नती साठी २५ % अशी भरती पध्दतीचे प्रमाण ठेवलेले आहे ते दूरूस्त करून सरळ सेवातर्गत भरती ५० % व पदोन्नती साठी ५०% या प्रमाणे भरती पध्दत ठेवण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.मधील कमी सेवाकाळ राहिलेल्या सिनिअर कर्मचा-यांना सेवा जेष्ठ ते प्रमाणे पदोन्नती द्यावी त्या साठी असलेली शैक्षणिक पात्रता शिथील करणेत यावी. तसेच सरळ सेवे अंतर्गत भरावयाचे पदासाठी त्यांचा प्राधान्याने विचार करणेत यावा.

मा.श्री.घुले अ.ह.:- सहाय्यक क्रीडा अधिकारी या संवर्गातील पदोन्नती साठी महानगरपालिकेतील कनिष्ठ पदावर किमान २० वर्ष अनुभव असावा अशी अट टाकलेली आहे. ती शिथील करून किमान दहा वर्ष अनुभव अशी ठेवण्यांत यावी या प्रमाणे दूरूस्ती करणेत यावी.

मा.सभापती साहेब :- म.न.पा.मध्ये कोर्ट केस वारस म्हणून कार्यरत असलेल्या बिगारी कर्मचा-यांना त्यांचे शैक्षणिक पात्रते नुसार प्राधन्याने पदोन्नती देणेत यावी.

मा.श्री. तिवारी सु.र. :- म.न.पा.चे स्टॅपिंग पॅटर्नचे मंजूरीस विलंब लागणार असलेने कमी सेवाकाळ शिल्लक राहिलेल्या, पदोन्नती देणे बाकी असलेल्या सिनिअर कर्मचा-यांना त्यांचे शैक्षणिक पात्रते नुसार रिक्त पदावर प्रथम पदोन्नती देण्यांत यावी.

मा.श्री. त्रिपाठी सु.च.:- म.न.पा. मधील सर्व पदे प्राधान्याने म.न.पा.चे पात्र कर्मचा-यांमधूनच भरण्यांत यावीत पदोन्नतीस पात्र नसतील अशा प्रसंगीच अशी पदे सरळ सेवातर्गत भेट भरतीद्वारे भरण्यांत यावेत. प्रस्तावीत पदांसाठीचे पात्र कर्मचा-यांना पदोन्नती साठी प्रथम प्राधान्य देण्यांत यावे.

मा.श्री. तिवारी सु.र. व मा.श्री. बोरूडे अ.व :- मा.स्थायी समितीचे शिफारसी दूरूस्त्या सह प्रस्ताव मा.महासभे पुढे मंजूरीसाठी सादर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :-महानगरपालिका कर्मचारी युनियनने स्टॅपिंग पॅटर्न बाबत दिलेले पत्र उशिरा दिलेले असल्याने प्रशासनाने त्या वरील आपले मता सह स्थायी समिती ने सुचविलेल्या दूरूस्त्या सुचना सह स्थायी समिती ठराव अंतिम मंजूरी साठी म.न.पा.चे महासभे पुढे ठेवणेत यावा.

**ठराव :-** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९चे कलम ५१,५२,५३ व ५४ चे तरतुदीनुसार केलेल्या अहमदनगर महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची पदसंख्या, पदनाम, वेतनश्रेणी , सेवाशर्ती सह आकृती बंधा बाबत मा.शासन निर्णया प्रमाणे कार्यालयाने सादर केलेल्या दूरूस्त कार्यालयीन प्रस्तावा वर सभे मध्ये झालेल्या सविस्तर चर्चे नुसार सदरचे आकृती बंधा मध्ये पुढील प्रमाणे दुरूस्त्या शिफारसी करण्यांत येत आहेत.

महानगरपालिकेमध्ये केडर नंबर १ ते ५ मधील कर्मचा-यांची संख्या ८२ आहे. त्या मधील पदवी धरांची संख्या ३५ % व मॅट्रीक असलेल्या कर्मचा-यांची संख्या ६५% आहे. स्टॅपिंग पॅटर्न मध्ये पदोन्नती साठी पदवीधर ही शैक्षणिक पात्रता निश्चित केलेली आहे. ती शिथील करून एस.एस.सी. , एल.एस.जी.डी. व वीस वर्षाचा कामाचा अनुभव अशी व वयांची ४५ वर्षे पुर्ण केलेल्या कर्मचा-यास एल.जी.एस.ही शैक्षणिक पात्रता अथवा विभागीय परिक्षा देण्यांचे बंधन शिथील करण्यांत यावे.

जे.सी.बी. ड्रायव्हर या संवर्गातील पदाचे सरळ सेवांतर्गत भरती साठीचे प्रमाण १००% ठेवलेले आहे. सदरचे जे.सी.बी. ड्रायव्हर या संवर्गातील भरती साठी सरळ सेवातर्गत भरती ५०%व पदोन्नतीसाठी ५०% याप्रमाणे भरती पध्दतीत दूरूस्ती करण्यांत यावी.

सॅनिटरी सब इन्स्पेक्टर या संवर्गातील पदा साठी सरळ सेवांतर्गत भरती ७५% व पदोन्नती साठी २५% अशी भरती पध्दतीचे प्रमाण ठेवलेले आहे ते दूरूस्त करून सरळ सेवातर्गत भरती ५०% व पदोन्नती साठी ५०% या प्रमाणे भरती पध्दत ठेवण्यांत यावी.

सहाय्यक क्रीडा अधिकारी या संवर्गातील पदोन्नती साठी महानगरपालिकेतील कनिष्ठ पदावर किमान २० वर्ष अनुभव असावा अशी अट टाकलेली आहे. ती शिथील करून किमान दहा वर्ष अनुभव अशी ठेवण्यांत यावी या प्रमाणे दूरूस्ती करणेत यावी.

म.न.पा.मध्ये कोर्ट केस वारस म्हणून कार्यरत असलेल्या बिगारी कर्मचा-यांना त्यांचे शैक्षणिक पात्रते नुसार प्राधन्याने पदोन्नती देणेत यावी.

म.न.पा.चे स्टॅपिंग पॅटर्नचे मंजूरीस विलंब लागणार असलेने कमी सेवाकाळ शिल्लक राहिलेल्या, पदोन्नती देणे बाकी असलेल्या सिनिअर कर्मचा-यांना त्यांचे शैक्षणिक पात्रते नुसार रिक्त पदावर प्रथम पदोन्नती देण्यांत यावी.

म.न.पा. मधील सर्व पदे प्राधान्याने म.न.पा.चे पात्र कर्मचा-यांमधूनच भरण्यांत यावे. पदोन्नतीस पात्र नसतील अशा प्रसंगीच अशी पदे सरळ सेवातर्गत थेट भरती पध्दतीने भरण्यांत यावेत. प्रस्तावीत पदांसाठीचे पात्र कर्मचा-यांना पदोन्नती साठी प्रथम प्राधान्य देण्यांत यावे.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दूरूस्त्या शिफारसी सह मुंबई प्रांतिक म.न.पा.अ.नि १९४९ चे तरतूदी नुसार केलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचा आकृती बंध सेवाशर्ती सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

सदर आकृती बंधा बाबत म.न.पा कर्मचारी युनियनने दिलेले पत्र उशिरा प्राप्त झालेले असलेने प्रशासनाने आपले मतासह सदर प्रस्ताव मा.महासभे पुढे या ठरावा सोबत सादर करणेत यावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री. तिवारी सु.र.

अनुमोदक :- मा.श्री. बोरूडे अ.व.

ठराव सर्वानुमते मंजूर

sdxxx/-
सभापती
स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक-३**
**सन-२००७-२००८**

विषय क्रमांक.३ शुक्रवार दिनांक ४/५/२००७

ठराव क्रमांक.३ शुक्रवार दिनांक ४/५/२००७

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील जुना पिंपळगाव रोड वरील राजळे बंगला ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्या दरम्यान ८०० एम एम् व्यासाची गटर करणेचे कामास व एस्टीमेट रू. १४,९८,३३४/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकुर :-** उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, प्रभाग क्र. १ मधिल जुना पिंपळगांव रोड वरील राजळे बंगला ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्या दरम्यान ८०० एम.एम् व्यासाची गटर करणे आवश्यक आहे.

वसंत टेकडी परिसरा मधील संदेशनगर, नामदेव-नगर, भिटेवस्ती, श्रीकृष्ण नगर, नंदनवन नगर, तांबटकर-मळा इत्यादी कॉलनी मधील दरवर्षी येणारे पावसाचे पाणी जुना पिंपळगांव रस्त्या पर्यत येउन पुढील नरहरी नगरमध्ये घरांनी शिरते, एक वर्षा पूर्वी मा.खासदार निधि अंतर्गत कोहिनूर मंगल कार्यालय ते श्री. नरवडे घरा दरम्यान ६०० एम् एम् . व्यासाची बंद पाईप गटर करणेत आल्यामुळे वरील पावसाचे पाणी काही प्रमाणात जाण्यासाठी मार्ग निघालेला आहे. परंतु वरील सर्व कॉलनी मधील पाणी सद्य स्थितीत असलेल्या गटारी मधून जाणे शक्य नसून तेथे दूसरा आउटलेट सोडलेला नाही.

वरील कॉलनीमधील येणारे पावसाचे पाणी कोहिनूर मंगलकार्यालय ते पारिजात कॉर्नर ते श्री.जाधव यांच्या बंगल्याजवळील(तिरूमला)मुख्य नाल्यापर्यत केल्यास वरील सर्व कॉलनी मधील येणारे पावसाचे पाणी जाण्याचा मार्ग निघेल व प्रतेंक पावसाळयामध्ये नागरीकांच्या घरांनी पाणी जाणे बंद होईल.

सदर ठिकाणचे मोजमापे घेउन एकूण ५५०रनिंग मीटर ८००एम एम् व्यासाची बंद पाईपगटर करणेकामी अंदाजे रू.१४,९८,३३४/-इतका खर्च अपेक्षीत आहे.सदरचे काम महानगरपालिका फंडातून करावयाचे आहे सदरचे कामास व खर्चास पुढील कार्यवाही करणेस मंजूरीस्तव रिपोर्ट सविनय सादर.

| | |
|---|---|
| बजेट हेड- | गटर दुरूस्ती |
| तरतूद- | ७७,००,०००/- |
| खर्च- | ४८,०४,६११/- |
| शिल्लक- | २८,९५,३८९/- |

येणे प्रमाणे शाखा अभियंता श्री. काकडे एम् डी यांचा अहवाल असे.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी. :- शाखा अभियंता यांचे अहवाला प्रमाणे सदर कामाची आवश्यकता असलेने रक्कम रूपये १४,९८,३३४/- च्या खर्चास म.न.पा. फंडातून प्रशासकीय मंजूरी देणे योग्य वाटते निर्णयास्तव सादर. दि. ३०/३/२००७

अंतर्गत लेखा परिक्षक :- शहर अभियंता यांचे कडील प्रस्तावा प्रमाणे रक्कम रूपये १४,९८,३३४/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेस हरकत नाही. दि.११/४/२००७

मा.उपायुक्त साहेब (सा):-मान्यतेस हरकत नाही. प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर ठेवणे योग्य. दि. १२/४/०७

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही. दि.२०/४/२००७

सबब प्रकरण मा.स्थायी समिती पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक १ मधील जुना पिंपळगाव रोड वरील राजळे बंगला ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्या दरम्यान ८०० एम एम् व्यासाची गटर करणेचे कामास व एस्टीमेट रू. १४,९८,३३४/-चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफीस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असता त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.श्री.त्रिपाठी सु.चं. :- हा प्रस्ताव सन २००६-२००७ मध्ये तयार केला आहे. सदरचा खर्च कधी होणार आहे.

मा.सौ.पवार सं.बा.:- हे पाईप गटरचे काम प्रभाग क्रमांक एक मधील नसून ते प्रभाग क्र.२ मधील आहे. सदरचे काम पावसाळया पूर्वी तातडीने पूर्ण होणे गरजेचे आहे.ऑफीस रिपोर्ट मंजूर करावा.

शहर अभियंता श्री.मगर एन्.बी :- होय हा प्रस्ताव प्रभाग क्रमांक दोन मधीलच असून प्रभाग क्रमांक एक हा चुकीने टाकलेला आहे.हया प्रस्तावा मध्ये दर्शविलेला खर्च हा सन २००७-२००८ मध्ये खर्ची पडेल.

मा.श्री. त्रिपाठी सु.च. :- या कार्यालयीन प्रस्तावावर अंदाज पत्रकीय तरतूद दिलेली आहे त्या मध्ये खर्च अठ्ठेचाळीस लाख दर्शविलेला आहे. महिना भरात हा खर्च झाला आहे का?

सहाय्यक आयुक्त मा.श्री. देशमुख :- हा प्रस्ताव सन २००६-२००७ मध्ये तयार केलेला असून त्यावर दर्शविलेली तरतूद ही सन २००६-२००७ सालाची आहे. हया कामाचा खर्च सन २००७-२००८ मध्ये खर्ची पडेल.

मा.श्री.त्रिपाठी सु.च. :- हया कामास माझा विरोध नाही ऑफीस रिपोर्टा वर दर्शविलेली अंदाज पत्रकीय तरतूद व खर्च चुकीचा दर्शविलेला आहे. ऑफीस रिपोर्टा वर चालू सालची तरतूद द्यावयास हवी होती. मुख्य लेखा परिक्षक आपण माहिती द्यावी.

मुख्य लेखा परिक्षक श्री. कदम अ.ए.:- ३१ मार्च २००७ नंतरचे बीलाचा खर्च हा सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाचे तरतूदी मधून होईल.

मा.श्री. शेख मुदस्सर अ.इ. :- हा ऑफीस रिपोर्ट पूर्वीचा असला तरी खर्च सन २००७-२००८ मधून करणेस मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफीस रिपोर्टा नुसार काम करण्यास मंजूरी द्यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफीस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर.

**<u>ठराव :-</u>**अहमदनगर महानगरपालिकेचे हद्दीतील जुना पिंपळगाव रोड वरील श्री.राजळे बंगला ते पारिजात कॉर्नर ते तिरूमला बंगल्या जवळील नाल्यादरम्यान ८००एमएम् व्यासाची बंद पाईपची गटर करणेचे कामास व एस्टीमेट रूपये १४,९८,३३४/-(रूपये चौदा लाख अठ्ठयाण्णव हजार तीनशे चौतीस फक्त)चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे ऑफीस रिपोर्ट मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करावी.

सुचक :- मा.सौ. पवार सं.बा

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पो.ज.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती<br>
स्थायी समिती<br>
अहमदनगर महानगरपालिका.